क्र.१६-आरके/ओळखपत्र /दरपत्रके/२६-२७/२०२६.
पोलीस अधीक्षक कार्यालय,कोल्हापूर.
दिनांक - २५/११/२०२६.

दरपत्रके सूचना

पोलीस अधीक्षक कार्यालयांतर्गत विविध पोलीस ठाणे/शाखा, उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, अपर पोलीस अधीक्षक कार्यालय आणि पोलीस अधीक्षक कार्यालयामध्ये कार्यरत असलेले पोलीस अधिकारी/कर्मचारी, मंत्रालयीन कर्मचारी, वर्ग -४ कर्मचारी यांना ओळखपत्र पुरविणेसाठी वार्षिक करार करणेकामी नोंदणीकृत फर्मधारक व कंपनी यांचेकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदरची दरपत्रके सादर करताना एका ओळखपत्राचा दर, ओळखपत्र गळयात घालणेकरिता आवश्यक असणारी लेस अथवा ओळखपत्र अडकविणेसाठी टॅग इ.चे दर नमूद करणे आवश्यक आहे. जे अधिकृत फर्मधारक/कंपनी, सदर कामाकरिता दरपत्रके सादर करू इच्छितात त्यांची दरपत्रके सादर करण्याची अंतिम तारीख दिनांक ०७/१२/२०२६ रोजी १७:०० वाजे पर्यंत आहे. सदरची दरपत्रके मा. पोलीस अधीक्षक , कोल्हापूर यांचे नावे हस्ते किंवा टपालाद्ववारे सादर करावीत.

संबंधित फर्मधारक/कंपनी/व्यक्ती यांनी दिलेल्या दरपत्रके पोलीस अधीक्षक कार्यालय येथे उघडल्या जातील. दरपत्रके या दिलेल्या अटी व शर्तीनुसार स्वीकारणे अगर नाकारणे याबाबत पोलीस अधीक्षक हे अंतिम निर्णय घेतील व तो सर्वांना बंधनकारक राहील.

मा.पो.अ.यांचे मान्यतेने }

(राजेंद्र मस्के)
पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय)
पोलीस अधीक्षक कार्यालय कोल्हापूर

Scanned with OKEN Scanner